# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
## वैद्यकीय मुख्य कार्यालय
## सभावृत्तांत

दिनांक – ०६/०७/२०२१ वेळ – सायं.६.३० वा.

**विषय – धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीकडील विविध प्रलंबित विषयांचे अनुषंगाने पूर्वआढावा बैठकीचा सभावृत्तांत**

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीकडील विविध प्रलंबित विषयांवर चर्चा करणेकामी मंगळवार, दि.६ जुलै २०२१ रोजी सायं.६.३० वा. मा.अति.आयुक्तसो. यांच्या अध्यक्षतेखाली मा.अति.आयुक्त यांचे दालनात पूर्वआढावा बैठक आयोजित केली होती.

सदरचे बैठकीस खालील समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री.विकास ढाकणे | अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष |
| २) श्री.अंबर चिंचवडे | अध्यक्ष पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ |
| ३) श्री.आमोद कुंभोजकर | मुख्य लेखा परिक्षक |
| ४) श्री.चंद्रकांत इंदलकर | उप आयुक्त, कायदा व कामगार कल्याण विभाग |
| ५) डॉ.लक्ष्मण गोफणे | सहा. आरोग्य वैद्य.अधिकारी |
| ६) श्री.प्रमोद जगताप | कामगार कल्याण अधिकारी |
| ७) श्री.प्रदीप बाराथे | लेखाधिकारी, लेखा विभाग |
| ८) श्रीम.सुप्रिया सुरगुडे | सरचिटणीस, पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ |
| ९) श्री.गोरख भालेकर | प्रमुख संघटक, पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ |

समितीपुढील मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली –

| वि.क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| (१) | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेबाबत कर्मचारी महासंघासोबत चर्चा – | दुर्धर आजारांवरील दरमहा औषधे मिळणेसाठी निर्णय घेणेकामी वैद्यकीय विभागप्रमुख यांना अधिकार देणेत यावे.<br>धन्वंतरी विभागाकडून दि.१५/०४/२०२१ पासून आजपर्यंत ८८१ बिलांची र.रु.५,२८,००,०००/- इतक्या रक्कमेची बिले रुग्णालयांना अदा करणेत आलेली आहे असे सांगणेत आले. मागील ४ वर्षातील १३४ बिले रुग्णालयांनी कागदपत्रे सादर न केल्याने प्रलंबित आहेत. बिलांची तपासणी करुन ती मंजुर करण्याची संपुर्ण प्रक्रिया दिर्घ कालावधीची असल्याने सहा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले.<br>धन्वंतरी कक्षाकडील प्रलंबित बीलांची लवकरात लवकर अदायगी करणेकरीता ०२ लिपिक, ०१ उपलेखापाल कर्मचारी यांची तातडीने नियुक्ती करावे<br>धन्वंतरी कक्षाने प्रलंबित बिलांची यादी अति.आयुक्त सो.१ यांचेकडे सादर करावी. |

| | | |
|---|---|---|
| (२) ते (५) | श्री.किरण भगवंत कापसे, श्री.सुनिल तानाजी तांबे, श्री.अक्षय टोके, श्री.परशुराम सखाराम पाटील यांनी त्यांचे कुटूंब सदस्यांकरीता दरमहा औषधोपचारांसाठी होणा-या खर्चाची प्रतिपूर्ती करुन मिळण्यासाठी केलेला विनंती अर्ज - | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत ओपीडी स्वरुपाची बिले अदायगी करणेची तरतुद नाही. तरी महापालिकेतील कर्मचा-यांनी त्यांचे कुटूंब सदस्यांकरीता दुर्धर आजारांसाठी दरमहा औषधोपचारांसाठी होणा-या खर्चाची प्रतिपूर्ती करुन मिळण्यासाठी समितीपुढे विषय येण्याऐवजी मनपाचे मध्यवर्ती औषध भांडार व मनपा रुग्णालयांकडून अशा कर्मचा-यांना आवश्यक असलेली औषधे पुरविण्याची तजबीज करणेत यावी. अशा औषधांची यादी तयार करावी, असे उप आयुक्त कायदा व कामगार कल्याण यांनी सांगितले. त्यासाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजनेची अंमलबजावणी करताना धोरणामध्ये आवश्यक सुधारणा किंवा बदल करुन त्रुटी दूर करणेच्या दृष्टीने समितीपुढे मुद्दे मांडावेत. याकाभी मा.आयुक्त सो यांचेशी चर्चा करुन निर्णय घेणेत येईल. |
| (६) | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक यांना धन्वंतरी योजनेत समाविष्ट करुन त्यांचे कपातीबाबत निर्णयार्थ – | मा.आयुक्तसो. यांचेशी चर्चा करुन निर्णय घेणेत येईल. |
| (७) | प्राथमिक शिक्षण विभागातील श्री.पराग एकनाथ मुंढे, सहा.प्रशा. अधिकारी,श्रीम.रजिया खान, पर्यवेक्षक, श्रीम.अनिता जोशी, पर्यवेक्षक तसेच शिपाई कर्मचारी श्री.ढोले,श्री.निगडे,श्री.गायकवाड यांनी धन्वंतरी योजनेत सभासद करुन घेणेबाबत अर्ज केला असून निर्णयार्थ - | मा.आयुक्तसो. यांचेशी चर्चा करुन निर्णय घेणेत येईल. |
| (८) | मनपाचे रूग्णालयामध्ये कोवीड १९ या आजारासाठी दाखल झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना बाहेरुन आणलेल्या औषधांचे (High End Drugs) आणि Lab tests/Investigation चे बील Covid-19 च्या Government Notification नुसार अदा करणेबाबत - | मा.आयुक्तसो. यांचेशी चर्चा करुन निर्णय घेणेत येईल. |

| | | |
|---|---|---|
| (९) | धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीमध्ये महासंघ प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत महासंघाने दि.१४/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये श्री.गोरख तुकाराम भालेकर, प्रमुख संघटक व श्री.नवनाथ किसन शिंदे, कार्यकारिणी सदस्य यांची नियुक्ती करणेबाबत तसेच एक महिला प्रशासन अधिकारी यांची नेमणूक प्रशासन विभागामार्फत करणेबाबत- | धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीमध्ये महासंघ प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत महासंघाने दि.१४/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये श्री.गोरख तुकाराम भालेकर, प्रमुख संघटक व श्री.नवनाथ किसन शिंदे, कार्यकारिणी सदस्य यांची नियुक्ती करणेस मान्यता दिलेली आहे. तसेच एक महिला प्रशासन अधिकारी यांची नेमणूक मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने प्रशासन विभागामार्फत कार्यवाही करणेत यावी. |
| (१०) | हॉस्पिटलकडून करणेत येणारी सर्जरी व इतर दर निश्चित केले आहेत. याबाबत प्रपत्र अ यादीतील दरपत्रकास मान्यता मिळणेबाबत- | मा.मुख्यलेखापरीक्षक-धन्वंतरी दर पत्रकामध्ये नसलेल्या unlisted investigation/procedure प्रपत्र अ मध्ये नमूद दरांची तांत्रिक तपासणी करुन दरांचे अभिप्राय देणे आवश्यक आहे. प्रपत्र अ मध्ये नमूद ४६ बाबी ह्या धन्वंतरी योजना अस्तित्वात आल्यापासून समाविष्ट का केल्या नाहीत, या ४६ बाबी आज का समाविष्ट केल्या आहेत, या ४६ बाबी समाविष्ट करण्याची खरोखरच गरज आहे का किंवा त्या समाविष्ट करणे संयुक्तिक आहे का याचे उत्तर संबंधित विभागाने समितीपुढे सादर करावे.<br>मा.अधिष्ठाता,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांचाही या समितीमध्ये समावेश करण्यात यावा.<br>मा.आयुक्तसो. यांची वेळ घेवून धन्वंतरी स्वास्थ्य समितीची बैठक आयोजित करणेत येईल. |

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

कृपया तक्रारीचे निवारण होणेसाठी मा.आयुक्त सो यांचेसमवेत तातडीने मिटींग होणेस विनंती

कामगार कल्याण अधिकारी
कामगार कल्याण विभाग

उप आयुक्त,
कायदा विभाग

अध्यक्ष,
पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ

मुख्यलेखापरिक्षक
मुख्यलेखापरिक्षण विभाग

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
यांचे प्रतिनिधी
लेखा विभाग

सहा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी
वैद्यकीय विभाग

मुख्य लेखापरिक्षक
मुख्य लेखापरिक्षण
विभाग.

अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष